<u>रे.मु.क्र.१९९/२००६.</u>

## <u>निशाणी १३६ कडील आदेश</u>.

अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला. वादीने <u>निशाणी १२९</u> कडे अशाच प्रकारचा अर्ज यापुर्वी दिलेला आहे. सदरचा अर्ज उभय पक्षांचे म्हणणे ऐकुन घेऊन नामंजुर करण्यात आलेला आहे. त्या आदेशाविरुध्द वादीने वरिष्ठ न्यायालयामध्ये दाद मागितलेली नाही. याउलट त्याच आशयाचा प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. केवळ या अर्जामध्ये वादीने वरिष्ठ अधिका-यांमार्फत मोजणी करुन मिळावी, अशी मागणी केलेली आहे.

२. याआधी <u>निशाणी १२९</u> कडील आदेशामध्ये सविस्तर चर्चिल्याप्रमाणे वादी पुन्हा-पुन्हा मोजणीची मागणी करीत आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दावा निरंतर मनाई ताकीद हुकुमाकरीता आहे. प्रतिवादीने वाद मिळकतीतील वादीच्या शांततापुर्ण कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाई ताकीद हूकूमाची मागणी वादीने केलेली आहे. त्यामुळे वाद मिळकतीतील त्याचा असलेला कब्जा सिध्द करण्याची जबाबदारी सर्वस्वी वादीची आहे. दाव्यामध्ये अतिक्रमण केले असलेबाबतचे कथन नाही किंवा कब्जा परत मिळावा असेही मागितलेले नाही. न्यायालयीन आयुक्त नेमुन वाद मिळकतीची मोजणी करुन घेऊन वादीस पुरावा गोळा करता येणार नाही हे <u>निशाणी १२९</u> कडील अर्जात नमुद केलेले आहे. तसेच पुरावा एकत्रित करण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्यात येऊ नये असे कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे. दावा जुना असून मोजणी आणि मोजणी अहवाल या प्रक्रियेतच तो प्रलंबित राहिलेला आहे. अशाप्रकारे पुन्हा-पुन्हा अर्ज देऊन वारंवार मोजणीचे आदेश केल्यास कधीही न संपणारे चक्र सुरु राहणार आहे. वादी केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याकरीता सदरचे अर्ज देत आहे असे निदर्शनास येत आहे.

३. प्रस्तुत अर्जाचे पुष्ट्यर्थ वादीने <u>*AIR 1983 NOC 196 (KER) Parambath Balan and another Vs. Vellangattu Kousu and others*</u>. या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या गुणोत्तरामध्ये 'जर न्यायालयास आयुक्ताचा अहवाल समाधानकारक वाटला नाही, तर नवीन अहवाल सादर करण्यास, आयुक्तास सांगुन पुन्हा कमिशन भरणेबाबत आदेशित करु शकते' असे सांगितले आहे.

४. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये केवळ वादीस मोजणीचा अहवाल मान्य नाही. प्रतिवादीने तो मान्य केलेला आहे. त्यामुळे त्या अहवालाबाबत वादी समाधानकारक नसल्याचे दिसून येते. प्रस्तुतच्या दाव्यातील घटना व वस्तुस्थिती पाहता, सदरचा न्यायनिर्णय वादीच्या मदतीस येऊ शकत नाही.

५. वादीने निशाणी १२९ कडील अर्ज नामंजुर करण्यात आलेला असूनही पुन्हा अशाच प्रकारचा अर्ज देवुन प्रस्तुत दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. सबब वर नमुद सर्व कारणास्तव अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. अर्ज (नि.१३६) रुपये ३००/- इतक्या खर्चाने नामंजुर करण्यात येतो.

२. सदरच्या खर्चाची रक्कम वादीने शासनखाती जमा करण्याची आहे.

दिनांक:- २०.०६.२०१४
कर्जत

सही/-
(आरती कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कर्जत.